दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...
पुणे/पिंपरी-चिंचवड

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. १९ नोव्हेंबर, २०२५ | वर्ष - १ | अंक - ५६ | पाने - ४

## विशेष संपादकीय

### पितृप्रेम, पार्थ आणि महाराष्ट्राचे राजकीय समीकरण

***राजकारण हे फक्त निवडणुकीतील टक्केवारीचा खेळ नाही; ते संवेदनशीलतेचा, कौटुंबिक बांधिलकीचा, दूरदृष्टीचा आणि धोरणात्मक गणिताचा संगम आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांत अनेक प्रसंगांनी दाखवले आहे की, पितृप्रेम फक्त घरगुती मूल्य नाही; ते राजकीय निर्णयांच्या धर्तीवरही प्रभाव टाकू शकते. अजित पवार हे या समीकरणाचे उत्तम उदाहरण आहेत. अनुभव, शहाणपण आणि कार्यकर्त्यांशी असलेली गाढ निष्ठा, हे त्यांच्या राजकीय निर्णयांमध्ये स्पष्ट दिसते.***

पार्थ पवार हे गेल्या विधानसभा निवडणुकीत हिरो ठरलेले व्यक्तिमत्व. कार्यकर्त्यांमध्ये त्यांची लोकप्रियता ठळक होती, आणि त्यांनी केंद्रस्थानी राहून मराठी राजकारणात स्वतःची छाप सोडली. मात्र, राजकारण फक्त लोकप्रियतेवर टिकत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या जाहीर होताच कार्यकर्त्यांकडून पार्थवर दबाव येऊ लागला – "राजकारणाकडे वळा, आपले भविष्य घडवा." या दबावाने पार्थच्या निर्णयक्षमतेवर ताण निर्माण केला, तर दुसरीकडे विरोधकांची काटेकोर नजरही त्यांच्यावर होती. या परिस्थितीत एक महत्त्वाचा अडथळा उभा राहिला – कोरेगाव जमीन घोटाळा प्रकरण. या प्रकरणात पार्थचा नामांकन होताच, त्यांच्या राजकीय भवितव्याबाबत चर्चांना नवे वळण मिळाले. विरोधकांकडून गुन्हा दाखल करण्याची मागणी, तसेच अनेक जमीन घोटाळ्यांची चौकशी करण्याचा कार्यक्रम, हे सर्व पार्थवर दबाव वाढवत आहेत. आता प्रश्न असा आहे की, या घटनांमुळे पार्थ पुन्हा बॅकफूटवर गेले की त्यांनी परिस्थिती हाताळली, हा महाराष्ट्राच्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. राजकारणात गुन्हा दाखल करणे, विरोधकांचा हल्ला, किंवा धोरणात्मक तंत्र यांचा समतोल राखणे नवीन नाही. मात्र यावेळी पार्थ पवार हे फक्त युवा नेते नसून, महाराष्ट्राच्या राजकीय भवितव्याचा निर्णायक घटक बनून उभे राहिले आहेत. विरोधकांच्या आक्रमक कृतीमुळे पार्थला फक्त राजकीय धोरणांचा विचार नाही, तर कायदेशीर बाजूही नीट पाहावी लागते.राजकारण आणि कौटुंबिक निष्ठा यांचा संगम या प्रसंगी अधिक स्पष्ट होतो. पित्रप्रेमामुळे अजित पवारांच्या राजकारणाला उतरती कळा लागली आहे का? पवार साहेबांना विचारून पार्थने राजकारण करावे का? फडणवीस यांच्याकडून राजकारणाचे धडे घेतले पाहिजेत का? या सगळ्या प्रश्नांवर कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू आहे, आणि यामुळे पार्थच्या निर्णयक्षमतेवर सूक्ष्म दबाव निर्माण झाला आहे. पवार साहेबांनी पार्थबाबत घेतलेली भूमिका सूक्ष्म आणि विचारपूर्वक आहे. फडणवीस यांच्या गोटात चेंडू टाकत त्यांनी "तपास होणे आवश्यक आहे" अशी भूमिका मांडली, ज्यामुळे विरोधकांवर थेट आघात न करता पार्थसाठी एक सुरक्षित धोरणात्मक वातावरण तयार झाले. यातून स्पष्ट होते की, पवार साहेब केवळ कौटुंबिक निष्ठा न ठेवता, राजकीय गणिताचा विचार करून सूक्ष्म राजकारण करतात. तसेच, फडणवीस यांच्याकडून महाराष्ट्रातील विरोधकांनी कसे खेळ खेळले जात आहेत याचे धडे घेता येतात; त्यांच्या धोरणात्मक सूझीमुळे पार्थसारख्या नेत्यांसाठी राजकीय परिमिती ओळखणे सोपे होते. या दोन्ही नेत्यांचे अनुभव पार्थच्या निर्णयक्षमतेसाठी मार्गदर्शक ठरतात आणि कार्यकर्त्यांच्या अपेक्षांवर योग्य संतुलन साधण्यास मदत करतात. राजकारणातील या संवेदनशील संतुलनाचे मूल्य समजणे अत्यंत आवश्यक आहे. पितृप्रेम आणि कौटुंबिक बांधिलकीमुळे निर्णय प्रभावित होतात का? कार्यकर्त्यांचा दबाव कितपत निर्णायक ठरतो? विरोधकांचे आक्रमण आणि कायदेशीर अडथळे पार्थच्या राजकीय प्रवासाला कितपत टोकास नेतात? हे सगळे प्रश्न महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणात गंभीर चर्चेचे विषय आहेत. महाराष्ट्रातील राजकीय हालचाली सतत बदलत आहेत. कोरेगाव प्रकरण, स्थानिक निवडणुका, आणि कार्यकर्त्यांचा दबाव या तिन्ही घटकांनी पार्थच्या राजकीय भविष्याचा वेध अवघड केला आहे. तरीही एक गोष्ट स्पष्ट होते – राजकारण हे फक्त सत्ता मिळवण्याचे साधन नसून, ते संवेदनशीलतेचा, धैर्याचा आणि दूरदृष्टीच्या शहाणपणाचा खेळ आहे. अखेरीस, पार्थ पवार हे फक्त एका तरुण नेत्याचे उदाहरण नाहीत; ते महाराष्ट्राच्या राजकारणातील आगामी निर्णायक घटक ठरू शकतात. त्यांच्या पितृकडून मिळालेल्या राजकीय धड्यांवर आधारित धोरणे, कार्यकर्त्यांशी बांधिलकी, आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग यांचा संगम त्यांच्या राजकीय प्रवासाला आकार देतो. विरोधकांचा दबाव, जमीन घोटाळ्याचे आरोप, आणि न्यायालयीन चौकशी या सर्व अडथळ्यांवर मात करत पार्थ पवार पुढील पाऊल कसे टाकतात, हे पाहणे केवळ राजकीय विश्लेषकांसाठीच नाही, तर सामान्य नागरिकांसाठीही उत्सुकतेची बाब ठरली आहे. राजकारणाचा हा प्रवास – जिथे पितृप्रेम, कौटुंबिक बांधिलकी, कार्यकर्त्यांचा दबाव आणि कायदेशीर अडथळे यांचा संगम आहे – महाराष्ट्राच्या राजकीय नकाशावर नवे अध्याय लिहित आहे. पार्थ पवार यांचे पुढील पाऊल, त्यांची शहाणपणपूर्ण धोरणे, आणि कार्यकर्त्यांशी असलेली निष्ठा, हे सर्व मिळून महाराष्ट्राच्या राजकारणात नवे वेध निर्माण करणार आहेत.

**- डॉ. अशोक बालगुडे,** संपादक, दै. राज्य लोकतंत्र, पुणे

## सारांश वृत्त

### एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना टोला

भाईंदर : काही लोकं बाळासाहेबांचे नाव घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशी लोकं आपल्या सवंगड्यांना घरगडी म्हणून वागवित असल्याचा टोला उपमुख्यमंत्री तथा शिंदे शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला. मिरा-भाईंदरमध्ये साकारण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनाच्या अधिकृत लोकार्पणावेळी ते बोलत होते. गेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वीदेखील अर्धवट असलेल्या या कलादालनाचे घाईघाईने त्यांच्याच हस्ते लोकार्पण करण्यात आले होते.

### फाशीचा निकाल राजकीय : हसीना

ढाका : भारतात आश्रय घेतलेल्या शेख हसीना यांनी एका निवेदनात हा फाशीचा निकाल पक्षपाती आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे म्हटले आहे. हा निर्णय एका अनिर्वाचित सरकारने स्थापन केलेल्या आणि अध्यक्षस्थानी असलेल्या 'रिग्ड ट्रिब्युनल'ने दिला आहे, ज्यांच्याकडे कोणताही लोकशाही जनादेश नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. निष्पक्ष सुनावणीसाठी त्यांनी हेग येथील आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयापुढे खटला चालवण्याचे आव्हान दिले आहे.

### ३१ डिसेंबरपर्यंतचे राजकीय, सामाजिक खटले मागे घेणार

मुंबई : राज्यात नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीची धामधूम सुरू असताना राज्य सरकारने सोमवारी राजकीय आणि सामाजिक आंदोलनांतील प्रलंबित गुन्हे मागे घेण्याची मुदत या वर्षअखेरपर्यंत वाढवली आहे. या निर्णयानुसार, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांतील ज्या गुन्ह्यांत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत दोषारोपपत्र दाखल होतील, असे खटले मागे घेतले जाणार आहेत.

## दोन, तीन दिवसात निवडणूक घोषणेची शक्यता

# जिल्हा परिषदेसाठी स्वबळाची तयारी!

### मिनी मंत्रालय हवे प्रत्येकाला आपल्या ताब्यात

**मुंबई : सर्वोच्च न्यायालयाची वेळेची टांगती तलवार असल्याने जिल्हा परिषद निवडणुका डिसेंबरच्या दुसऱ्या किंवा शेवटच्या आठवड्यात घेण्याचा सरकारचा विचार असून येत्या दोन किंवा तीन दिवसात त्याबाबत निवडणूक आयोग घोषणा करण्याची शक्यता आहे.**



नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका पार पडताच जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा बार उडणार आहे. गेली काही महिने या निवडणुका होणार म्हणून इच्छुकांनी तयारी केली आहे. मात्र, या निवडणुका सतत लांबणीवर पडत गेल्या. आता मात्र, या निवडणुकांची घोषणा काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. सर्वच प्रमुख पक्षांनी यासाठी जय्यत तयारी सुरू केली आहे. युती आणि आघाडी होणार नाही हे गृहीत धरून सर्वच प्रमुख पक्ष कामाला लागले आहेत. महायुतीत नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत बहुतांश ठिकाणी युती झालेली नाही. नेत्यांनी आपापली ताकद पणाला लावत स्वबळावर निवडणुका लढण्यावर भर दिला आहे. अनेक ठिकाणी पक्षाशी युती करण्यापेक्षा स्थानिक आघाड्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तोच पॅटर्न जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही दिसण्याची शक्यता आहे. ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहेत.

ग्रामीण भागावर वर्चस्व मिळविण्यासाठी आणि आपल्या जिल्ह्यावर आपली पकड दाखवून देण्यासाठी नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक मंत्री, आमदार, खासदारांची परीक्षा ठरणार आहेत.

या निवडणुकांची घोषणा नोव्हेंबर महिन्यातच होणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार नगरपरिषदा आणि नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. ३ डिसेंबर रोजी मतदानाचे निकाल जाहीर होतील. त्यानंतर डिसेंबर महिन्यामध्येच जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेतल्या जातील. त्यादृष्टीने राज्यातील सर्वच प्रमुख पक्षांनी तयारी सुरू केली आहे. सध्यातरी निवडणुकीत युती करण्याबाबत महायुती आणि महाविकास आघाडीत चर्चा सुरू नाही.

### भाऊ, दादा, भाईंची कसोटी

विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळविल्यानंतर भाजपसह महायुतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी ताकद झोकून देईल यात शंका नाही. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. तर, काँग्रेस, उबाठा शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या निवडणुकीतून गमावलेला आत्मविश्वास परत मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहील.

## खरडलेल्या शेतजमिनीसाठी मोफत माती, गाळ मुरूम देणार

### बावनकुळे : पूरग्रस्त जमिनीसाठी गौण खनिज रॉयल्टी माफ

**मुंबई :** अतिवृष्टी व पुरामुळे खरडून गेलेल्या शेतजमिनीला पूर्वस्थितीत आणण्यासाठी लागणारी माती, गाळ, मुरूम आणि कंकर मोफत पुरवण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. (रॉयल्टी) माफीच्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे सक्त आदेश बावनकुळे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

राज्याच्या अनेक भागात अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण झाल्याने शेतपिकांचे नुकसान झाले आहे. शिवाय, मनुष्य व पशुहानी यासह शेतजमीन खरडून जाणे, अतिरिक्त गाळ साठणे आणि जमिनीचा सुपीकस्तर वाहून जाण्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत.

> पुरामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्यांची जमीन पुन्हा लागवडी योग्य व सुपीक करण्यासाठी लागणाऱ्या माती, गाळ, मुरूम, कंकर या गौण खनिजांवरील स्वामित्वधन नैसर्गिक आपत्तीग्रस्त व्यक्तींना घर, गुरांचा गोठा, शेत व विहीर यांसाठी आवश्यक पाच ब्रास गौण खनिजाच्या वापरासाठी स्वामित्वधनातून सूट मिळेल. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे जाईल.
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे,** महसूलमंत्री.



## विद्यापीठांच्या गुणांकनासाठी टास्क फोर्स स्थापन करा!

**मुंबई :** राज्यातील विद्यापीठांच्या गुणवत्तावृद्धीसाठी तातडीने ठोस पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन राज्यपाल तथा कुलपती आचार्य देवव्रत यांनी केले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठांचे गुणांकन उंचावण्यासाठी सतत व संघटित प्रयत्न हवे आहेत.

प्रत्येक विद्यापीठाशी थेट निगडित अशी एक टास्क फोर्स उभी करावी जी दर पंधरवड्याला प्रगती अहवाल देईल, अशा सूचनाही त्यांनी सोमवारी बैठकीत दिल्या. राजभवन येथे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि व्हिजन महाराष्ट्र २०४७' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते. राज्यपाल म्हणाले की, विद्यापीठे ही विद्या आणि संस्कारांची केंद्रे असावीत. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद व सहकार्य वाढले तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास निश्चित होईल. तसेच खेळ, एनसीसी, एनएसएस यांसारख्या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, शैक्षणिक धोरणांना संदर्भातील कार्यशाळेचे आयोजन दर तीन महिन्यांनी उच्च तंत्र शिक्षण विभागामार्फत करण्यात येते. या पुढेही आपण अशा कार्यशाळेत ऑनलाईन माध्यमातून सहभागी होऊन मार्गदर्शन करावे, अशी विनंती राज्यपालांना केली.

## इस्त्रीत लपविले कोट्याधींचे सोने

### हैदराबाद विमानतळावरील घटना, दोघे अटकेत



**मुंबई :** हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोन्याच्या तस्करीची घटना समोर आला आहे. गुप्त माहितीच्या आधारे, डीआरआयच्या हैदराबाद झोनल युनिटच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी (१४ नोव्हेंबर २०२५) शारजाहहून परतलेल्या तस्कराला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ११ सोन्याची बिस्कीटे जप्त करण्यात आले. त्याने अतिशय हुशारीने हे सोने सामानात लपवले होते. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित प्रवाशाने लोखंडी इस्त्रीमध्ये सोन्याची बिस्कीटे लपवली होती. मात्र, अधिकाऱ्यांना अधिच या तस्करीची माहिती मिळाल्यामुळे, त्याचा भांडाफोड झाला. डीआरआयच्या पथकाने कसून चौकशी केली असता, तस्कराने एका स्थानिक हँडलरचे नाव घेतले. त्यानंतर, नेल्लोर सब-झोनल युनिटच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली आणि आंध्र प्रदेशातील वायएसआर जिल्ह्यातील प्रोद्दातुर येथील आरोपीला ताब्यात घेतले. सोन्याचे मूल्यः १.५५ कोटी जप्त केलेल्या सोन्याचे वजन ११९६.२० ग्रॅम असून, त्याचे मूल्य अंदाजे १.५५ कोटी आहे. हे सोने सीमाशुल्क कायदा, १९६२ च्या कलम ११० अंतर्गत जप्त करण्यात आले आहेत. तसेच, दोन्ही आरोपींना सीमाशुल्क कायद्याच्या कलम १०४ अंतर्गत अटक करण्यात आली आहे.



नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनात मराठमोळ्या पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झालेले स्वागत.

## सौदीत उमराह यात्रेकरूंच्या बसला आग; ४५ ठार

**रियाध :** सौदी अरेबियामध्ये उमराह यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या एका बसला टँकरने धडक दिल्यानंतर भीषण आग लागून झालेल्या अपघातात हैदराबादच्या ४५ यात्रेकरूंचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २० महिला आणि ११ बालकांचा समावेश आहे. हा हृदयद्रावक अपघात बद्र आणि मदिनादरम्यान मुफ्राहाथ येथे रविवारी मध्यरात्रीनंतर १.३० च्या सुमारास घडला. बसमध्ये एकूण ४६ प्रवासी होते, त्यापैकी केवळ एकजण बचावला. तेलंगणा सरकार मृतांच्या कुटुंबीयांपैकी दोन सदस्यांना मृतदेह आणण्यासाठी सौदीला पाठवणार आहे. मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.



## महायुतीत 'नाराजीनाट्य' चिघळले!

**शिंदेंना युतीतून बाहेर पडण्याचा नवा राजकीय 'भडिमार'**

**माजी मंत्री वडेट्टीवारांचे भाकित; शहाजीबापू पाटील यांची संतप्त प्रतिक्रिया, मुंबईतील हालचालींमुळे राजकीय तापमान उसळले**

**मुंबई :** राज्यात महायुतीत नाराजीची ठिणगी पेटली असून ती आता ज्वाळांमध्ये बदलत चालली आहे. शिवसेना (शिंदे गट) मंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीचा बहिष्कार टाकल्यानंतर राजकीय वातावरण आणखी तापले आहे.

बैठकीला फक्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. त्यानंतर शिंदे गटाच्या मंत्र्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन भाजपात सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणातील 'इन्कमिंग'वर आक्षेप नोंदवला. ही नाराजी शांत करण्यासाठी प्रयत्न सुरु झाले असले तरी तणाव शमण्याची चिन्हे नाहीत. या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारी दोन मोठी विधानं समोर आली आहेत. शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी भाजपावर ताशेरे ओढत संताप व्यक्त केला. "एखाद्या अबलेवर बलात्कार केल्यासारखं भाजपाचं वागणं आहे.

## शेतकऱ्यांसाठी AI व ब्लॉकचेनची मदत; मुंबईत बीज महाकुंभ

### देवेंद्र फडणवीस-शिवराजसिंह चौहान यांची जोडी; उच्च दर्जाच्या बियाण्यांच्या पुरवठ्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

**पुणे :** संशोधनावर किमान 10% गुंतवणुकीचे आवाहन मुंबईमध्ये सुरू झालेल्या 'बीज महाकुंभ 2025' ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते भव्य सुरुवात झाली. आशियातील सर्वात मोठ्या मानल्या जाणाऱ्या एसियान सीड काँग्रेसला कृषी संशोधकांचा "ग्लोबल चौपाल" असा गौरव उल्लेख फडणवीस यांनी केला.




हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण बियाण्यांची गरज वाढत असून, निकृष्ट बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू नये म्हणून AI आणि ब्लॉकचेनसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा व्यापक वापर केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. बियाणे उद्योगाची उत्पादनवाढीतील भूमिका निर्णायक असल्याचे नमूद करत चौहान यांनी खासगी बियाणे उद्योगाने संशोधन-विकासासाठी किमान 10 टक्के गुंतवणूक करावी, असे स्पष्ट आवाहन केले. काश्मीर ते कन्याकुमारीदरम्यान असलेल्या 15 agro-climatic zones मुळे भारताकडे जागतिक बियाणे निर्यातीची मोठी क्षमता असल्याचेही त्यांनी सांगितले. येत्या हिवाळी अधिवेशनात केंद्र सरकार 'बीज सुधार कायदा' आणणार असून, उद्योगाने आपल्या सूचना द्याव्यात असेही त्यांनी सांगितले. भारताचा बियाणे उद्योग सध्या 40-50 हजार कोटींच्या उलाढालीपर्यंत पोहोचला असून, जागतिक स्तरावर पाचव्या क्रमांकावर आहे. बियाणे व्यवसायातील वृद्धीसाठी मोठी संधी असल्याचे सीड असोसिएशन ऑफ इंडियाचे प्रमुख अजय राणा यांनी सांगितले. या काँग्रेसला 40 देशांतील प्रतिनिधी सहभागी झाले असून, वेगवेगळ्या देशांतील कंपन्यांचे स्टॉल्स, व्यापार करार आणि ज्ञान-विनिमय हे मुख्य आकर्षण ठरत आहेत. 'APSA' आणि 'NSAI' यांच्या संयुक्त आयोजनातून झालेला हा मेगा उपक्रम कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि जागतिक सहकार्याचा नवा अध्याय लिहित आहे.

## सारांश वृत्त

### आळंदीत लीला स्मृती – एकनाथ ग्रंथमाला ग्रंथाचे प्रकाशन

**आळंदी :** आळंदी कार्तिकी वारीचे औचित्य साधून दंडवत लीला स्मृती व एकनाथ ग्रंथमाला या ग्रंथाचे प्रकाशन हरिनाम गजरात स्वामी अमृतनाथ मठात ह. भ. प. राष्ट्रे कीर्तनकार चैतन्य महाराज देगलूरकर, डॉ. विकासानंद महाराज मिसाळ यांच्या हस्ते झाले.

या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास माधवदास जी महाराज, संतोष आनंद शास्त्रीजी, लोकेश चैतन्य महाराज रामराजे भुवनकर, आळंदी देवस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील यांचेसह राज्यातील वारकरी संप्रदायातील उर्धवयू जेष्ठ कीर्तनकार, मान्यवर वारकरी, भाविक उपस्थित होते.

ग्रंथाचे संशोधक व प्रकाशक धर्मगुरू अमृत आश्रम स्वामी यांच्या संप्रदायातील महान कार्याबद्दल बोलताना चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले, संत एकनाथ महाराज, संत नरहरी महाराज, सिद्ध श्रीधर स्वामी, गावोबा महाराज नित्यानंदनाथजी, संत तुकाराम महाराज यात माधव त्रिंबक शाळीग्राम म्हणजे परमहंस दंडवत स्वामी यांच्या सागर चरित्राचा विस्तार लिखित स्वरूपात अभ्यासासाठी तयार करण्यात आलेला आहे. दंडवत स्वामींची परंपरा श्री केशव महाराज, नारायण महाराज, व्यंकट महाराज, रामचंद्र महाराज, धर्मदेव महाराज, शाहू देव महाराज, त्रिंबकनाथ देव, आनंद बाबा व विद्यमान अमृत आश्रम स्वामी सद्यस्थितीला वर्तमान काळात हे कार्य करत आहेत, असे त्यांनी सांगितले.

चैतन्य महाराज पुढे बोलताना म्हणाले, आपल्या भारतीय संत महात्म्यांच्या गुरु शिष्य परंपरा समाजाला माहीत होणे. हि काळाची गरज आहे. या ग्रंथ चरित्र वाचनाने मानवाचे चारित्र्य व्यवस्थित होते. देवाला देवाच्या चरित्रा पेक्षा संतांचे गुणांनुवाद जास्त आवडतात असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### विवाह समारंभातून दागिने लंपास

**पुणे :** विवाह समारंभातून दोन लाख २० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना लोणी काळभोर भागात घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. विवाह समारंभातून दागिने चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, आठवडाभरातील ही दुसरी घटना आहे. याबाबत एकाने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हवेली तालुक्यातील नायगाव परिसरात राहायला आहेत. १६ नोव्हेंबर रोजी लोणी काळभोरमधील कुंजीरवाडी भागात एका कार्यालयात तक्रारदाराच्या नातेवाईकांचा विवाह समारंभ होता. तक्रारदाराची पत्नी विवाह समारंभासाठी गेली होती. त्यांचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्यांनी दागिने लांबविले.

# आरंभ है प्रचंड! बारामतीत अजित पवारांनी दिला तगडा उमेदवार

## शरद पवार 'त्या' पराभवाचा वचपा काढणार? की भाजपचं कमळ फुलणार?

**बारामती :** नगर परिषदेची निवडणूक सर्वसाधारण जागेसाठी नगराध्यक्ष पद आरक्षित असले तरी यंदा चांगलीच गाजण्याची चिन्हे आहेत. कारण बारामतीमध्ये भाजपने ओबीसी कार्ड खेळले आहे, तर महाविकास आघाडीदेखील ओबीसी उमेदवार देण्याची शक्यता आहे. मात्र या परिस्थितीत अजित पवारांनी त्यांचा खंदा शिलेदार मैदानात उतरवला आहे.



अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने बारामती नगरपरिषदेसाठी नगराध्यक्ष म्हणून सचिन सदाशिव सातव यांना निवडणूक रिंगणात उतरवले आहे. भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय संघाचे येथील पदाधिकारी व भाजपचे कट्टर समर्थक गोविंद देवकाते यांना नगराध्यक्ष पदासाठी पुढे केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्ष, शिवसेना (उबाठा), काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी या सर्वांच्या वतीने महाविकास आघाडी मार्फत उमेदवार उभे करण्यात आले आहेत. यामध्ये महाविकास आघाडीदेखील सर्वसाधारण जागेसाठी ओबीसी कार्ड खेळण्याची शक्यता आहे. त्यांनी नगराध्यक्ष पदाचा उमेदवार उद्या जाहीर करण्याचे सुचित केले आहे.

विधानसभा व लोकसभा निवडणुकीनंतर माळेगाव कारखान्यामध्ये पवार विरुद्ध पवार असा सामना झाला आणि यामध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला पराभवाचा मोठा सामना करावा लागला. आता बारामती नगरपरिषदेच्या निवडणुकीत देखील राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाने विरोधकांची मोट बांधत उमेदवार नगरपरिषदेच्या रिंगणात उतरवले आहेत. आता देखील पवार विरुद्ध पवार हा सामना रंगण्याची शक्यता आहे. मात्र, यावेळी तरी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदरात किती यश पडते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. या निमित्ताने बारामती नगरपरिषदेची निवडणूक राज्यात चर्चिली जाणार हे मात्र नक्की!

राष्ट्रवादीची उमेदवार यादी : नगराध्यक्षपद : सचिन सदाशिव सातव, प्रभाग क्र. १ : मनीषा समीर चव्हाण, अविनाश निकाळजे, प्रभाग क्र. २ : जय पाटील, अनुप्रिता डांगे, प्रभाग क्र. ३ : प्रवीण दत्तू माने, रुपाली नवनाथ मलगुंडे, प्रभाग क्र. ४ : विष्णुपंत चौधर, संपदा चौधर, प्रभाग क्र. ५ : किशोर आप्पासाहेब मासाळ, ऋतुजा प्रताप पागळे, प्रभाग क्र. ६ : अभिजीत जाधव, धनश्री अविनाश बांदल, प्रभाग क्र. ७ : प्रसाद खारतुडे, भारती विश्वास शेळके, प्रभाग क्र. ८ : अमर धुमाळ, श्वेता योगेश नाळे, प्रभाग क्र. ९ : विशाल भानुदास हिंगणे, पूनम ज्योतीबा चव्हाण, प्रभाग क्र. १० : जयसिंग देशमुख, अनीता गायकवाड, प्रभाग क्र. ११ : संजय संघवी, सविता जाधव, प्रभाग क्र. १२ : अभिजीत चव्हाण, सारीका अमोल वाघमारे, प्रभाग क्र. १३ : बिरजू भाऊसाहेब मांढरे, सुनीता अरविंद बगाडे, प्रभाग क्र. १४ : नवनाथ बल्लाळ, आप्पा अहिवळे, प्रभाग क्र. १५ : जितेंद्र बबनराव गुजर, मंगला जयप्रकाश किर्वे, प्रभाग क्र. १६ : मंगल शिवाजीराव जगताप, गोरख पारसे, प्रभाग क्र. १७ : अलताफ सय्यद, शर्मिला शिवाजीराव ढवाण, प्रभाग क्र. १८ : राजेंद्र सोनवणे, अश्विनी सूरज सातव, प्रभाग क्र. १९ : सुनील दादासाहेब सस्ते, प्रतिभा विजय खरात, प्रभाग क्र. २० : प्रथमेश प्रवीण गालिंदे, दर्शना विक्रांत तांबे, फरहीन फिरोज बागवान.

# थोरल्या पादुका येथे पालखी सोहळा गुरुवारी विसावणार



**आळंदी :** श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने विठ्ठल महाराज वासकर यांच्या देखरेखीखाली पंढरपूर ते आळंदी आणि आळंदी ते पंढरपूर या मार्गावरील परतीच्या वारीत श्री पांडुरंगरायांचा पालखी सोहळा गुरुवारी (दि. २०) मुक्कामी श्री ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्ट, वडमुखवाडी येथे विसावणार आहे.

ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर यांनी ही माहिती दिली. या ठिकाणी पालखी सोहळा विसावण्याचे हे १६वे वर्ष असून, अखंड सेवा सुरु आहे. मुक्कामात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. संध्याकाळी सुमारे सात वाजता पालखी सोहळ्याचे आगमन होऊन हरिनाम गजरात स्वागत करण्यात येईल. सोहळ्यातील कार्यक्रमांमध्ये श्रींच्या पादुकांची पूजा व आरती, मान्यवर पदाधिकारींचे सत्कार, भाविकांना श्रींचे पादुका दर्शन आणि महाप्रसाद वाटप यांचा समावेश आहे. विसाव्यात मुक्कामी श्रींचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर यांनी भाविकांना केले आहे.

# शहरात गुरुवारी पाणीपुरवठा राहणार बंद

## विविध जलकेंद्राच्या देखभाल दुरुस्तीची होणार कामे

**पुणे :** विविध जलकेंद्रांच्या देखभाल-दुरुस्तीमुळे येत्या गुरुवारी (२० नोव्हेंबर) जवळपास संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे, तर शुक्रवारी (२१ नोव्हेंबर) सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.



या विभागात पाणी येणार नाही : नवीन पर्वती जलशुद्धीकरण केंद्र (५०० एमएलडी), जुने पर्वती जलशुद्धीकरण केंद्र व त्याअंतर्गत पर्वती एमएलआर टाकी परिसर, पर्वती एचएलआर टाकी परिसर व पर्वती एलएलआर टाकी परिसर, पर्वती टँकर पॉइंट, वडगाव जलशुद्धीकरण केंद्र, राजीव गांधी पंपिंग स्टेशन, लष्कर जलकेंद्र, चिखली जलकेंद्र, वारजे जलकेंद्र व त्या अखत्यारितील चांदणी चौक टाकी परिसर, गांधी भवन टाकी परिसर, पॅनकार्ड क्लब जीएसआर टाकी परिसर, वारजे जलकेंद्र लगत जीएसआर टाकी परिसर, शिवणे इंडस्ट्रीज परिसर, एसएनडीटी एचएलआर टाकी व एमएलआर टाकी परिसर, चतु:शृंगी टाकी परिसर, होळकर जलकेंद्र, खडकवासला जॅकवेल वारजे फेज क्र. १ व २, गणपती माथा, जुने वारजे जलकेंद्र व नव्याने समाविष्ट गावे बूस्टर पंपिगअंतर्गत येणारा परिसर येथील पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

खडकवासला धरण ते पर्वती जलकेंद्रापर्यंत तीन हजार मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आलेली आहे. खडकवासला धरणातून एक हजार ४०० मिलिमीटर व्यासाच्या दोन जलवाहिन्या तीन हजार मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीला जोडण्यात आल्या आहेत. खडकवासला ते पर्वती तीन हजार मिलिमीटर व्यासाच्या वाहिनीवरील फ्लोमीटर बसविणे व एक हजार ४०० मिलिमीटर वाहिनीवरील बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसविणे या कामांसाठी एक हजार ४०० मिलिमीटर व्यासाचे व्हॉल्व्ह पूर्ण बंद होत आहेत. त्याच्या तपासणीसाठी व वडगाव जलशुद्धीकरण केंद्र ‘फेज २’ची क्षमता वाढविण्यासाठी नवीन संपवेल टाकीच्या भिंतीला कोअर कटिंग करण्यासाठी; तसेच देखभाल-दुरुस्तीच्या इतर कामांसाठी धरणातून होणारा संपूर्ण पाणीपुरवठा सकाळी सहा ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत बंद ठेवावा लागणार आहे. त्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

# जानाई-शिरसाई सिंचन योजनेसाठी ३५९ कोटींची निविदा

**दौंड :** पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि पुरंदर तालुक्यातील महत्त्वाच्या सिंचन योजनेसाठी जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतरण करण्याचे काम सुमारे ३५९ कोटी २९ लाख रुपयांच्या किमतीची निविदा प्रसिद्ध झाली आहे. ही माहिती दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांनी दिली.

आमदार कुल म्हणाले की, या योजनेअंतर्गत नवीन मुठा उजव्या कालव्याद्वारे वरवंड व शिर्सुफळ या दोन तलावांमध्ये पाणी सोडून तेथून उपसा करून जनाई व शिरसाई या दोन उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहेत. या योजनेद्वारे पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि पुरंदर तालुक्यातील एकूण १४,०८० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. योजनेअंतर्गत जनाई उपसा सिंचन योजनेतून ८,३५० हेक्टर आणि शिरसाई योजनेतून ५,७३० हेक्टर शेतजमिनींना पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच, जनाई उपसा योजनेच्या लाभक्षेत्रातील १८ आणि शिरसाई उपसा योजनेच्या ४७ तलावांना पावसाळ्यात वाहून जाणाऱ्या अतिरिक्त पाण्याने भरुन देण्याचे काम होणार आहे.

# घर घर संविधान उपक्रम शाळांमध्ये राबवणार : पठाण

**पिंपरी :** घर घर संविधान" हा उपक्रम सर्व शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर आणि जागरूकता वाढविण्यासाठी प्रत्येक शिक्षकाने बांधील राहिले पाहिजे, असे प्रतिपादन संविधान अभ्यासक नुरखॉं पठाण यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संविधान दिन (२६ नोव्हेंबर) पार्श्वभूमीवर महापालिका शाळांतील सर्व मुख्याध्यापकांसाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन चिंचवड स्टेशन येथील ॲटो क्लस्टर येथे करण्यात आले होते. संविधान म्हणजे काय, नागरिकांचा संविधानाशी असलेला संबंध, दैनंदिन जीवनातील संविधानाचे स्थान आणि महत्त्व, संविधानाचा उपयोग, तसेच स्वातंत्र्य संग्रामातील राजकीय, सामाजिक आणि सामाजिक लढा यावर सविस्तर मार्गदर्शन केले. संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, मसुदा समितीचे योगदान, तसेच भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये यांचेही त्यांनी सखोल विश्लेषण केले.


महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, म्हणाले की, "भारतीय संविधान या देशातील चरा चराचे संरक्षण व संवर्धन करणारे आहे. संविधानातील मूल्ये ही केवळ अभ्यासाचा भाग नसून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वर्तनात दिसली पाहिजेत. शिक्षकांनी या मूल्यांची बीजे विद्यार्थ्यांच्या मनात रोवली, तर समाजातील लोकशाही संस्कार अधिक दृढ होतील," असे त्यांनी सांगितले.

> महापालिका शाळांमधील प्रत्येक विद्यार्थी संविधानातील मूल्यांना जाणून वाढला, तर समाज अधिक मजबूत बनेल. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये समानता, न्याय, बंधुता आणि स्वातंत्र्य यांसारख्या मूलभूत मूल्यांचे संजीवनीरूप संस्कार करावेत, हीच संविधान दिनाची खरी प्रेरणा आहे." - **किरणकुमार मोरे,** सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड

# अजित पवारांच्या घरासमोर भानामतीचा प्रकार

## उमेदवारी मिळविण्यासासाठी अंधश्रद्धेचा आधार?

**बारामती :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर बारामतीत भीती आणि राजकीय खळबळ उडवून देणारी घटना घडली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ‘सहयोग’ निवासस्थानासमोर आज (मंगळवार, दि. १८) सकाळी लिंबू, मिरची, काळे कापड व पूजेचे साहित्य असे भानामतीचे साहित्य आढळल्याने परिसरात एकच सनसनाटी पसरली.



निवडणुकीत तिकीट मिळवण्यासाठी किंवा कुणाचे तिकीट कापण्यासाठी हे कृत्य केल्याची जोरदार चर्चा शहरात रंगत आहे. बारामतीमधील सहयोग सोसायटीतील रहिवासी सकाळी घराच्या गेटवर आले आणि जमिनीवर विखुरलेले हे साहित्य पाहताच एकच खळबळ उडाली. निवडणुकीच्या काळात अचानक असा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये संशय, भीती आणि राजकीय कारस्थानाबाबतचा कुजबुज वाढली. पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन तपास सुरू केला असून अशा स्वरूपाचा प्रकार बारामतीत प्रथमच झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, नगरपरिषदेच्या निवडणुकीत बारामतीत पुन्हा ‘पवार विरुद्ध पवार’ असा सामना रंगण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सचिन सदाशिव सातव यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर केली आहे. तर भाजपने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पार्श्वभूमीचे गोविंद देवकाते यांना उमेदवार केले आहे. महाविकास आघाडीही ओबीसी कार्ड खेळण्याच्या तयारीत असून त्यांचा उमेदवार उद्या घोषित होणार आहे. बारामती नगरपरिषदेची ही सर्वसाधारण निवडणूक असली तरी यंदा ती राज्याच्या राजकीय नकाशावर विशेष ठळक ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत. निवडणुकीच्या धामधुमीत अचानक घडलेला भानामतीचा प्रकार हा राजकीय दडपणाचा भाग की अंधश्रद्धेचा आधार? याची उत्सुकता जनतेत वाढली आहे.

# स्त्रियांसाठी प्रतापगड दुर्ग अभ्यास शिबिर



**पौड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची प्रेरणा देण्यासाठी पौडगावातील सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित श्री प्रतापगड दुर्ग अभ्यास शिबिरामध्ये पौड येथील ५५ शिवभक्तांनी सहभाग घेतला. या शिबिरात २५ लहान शिवपाईक, २० मातृशक्ती आणि १० धारकारी बंधू सहभागी झाले.

शिबिराच्या दौऱ्यात सहभागी लोकांनी श्री प्रतापगड दुर्ग, सुभेदार तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ, उमरठ, श्री क्षेत्र महाबळेश्वर आणि श्री क्षेत्र वाई गणपती या ऐतिहासिक ठिकाणी भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची माहिती मिळवली. आयोजकांचे म्हणणे आहे की, लहान शिवपाईक आणि महिला वर्गाला स्वराज्याच्या संरक्षणासाठी केलेल्या संघर्षाची ओळख करून देणे हा शिबिराचा मुख्य उद्देश होता. देशभरातून वीर योद्धे उदयास आले आहेत, त्यापैकी छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. त्यांच्या पराक्रमाची माहिती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी पौडगावातील शिवभक्त दरवर्षी अशा अभ्यास शिबिराचे आयोजन करत आहेत.

# “रिकामे वर्ग समाजाचे भविष्य थांबवतात”

## ॲड. घारे : पुणे पालिकेच्या शाळांत शिक्षकांच्या ३२० जागा रिक्त

**पुणे :** महापालिका शाळांमध्ये ३२० शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे माहिती अधिकारात उघड झाले. त्यावर टिप्पणी करताना ॲड. कृणाल घारे आणि आप शिक्षक आघाडीच्या शीतल कांडेलकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी म्हटले आहे. “सरकार शिक्षण सुधारणा, डिजिटल शाळा, स्मार्ट शिक्षणाचे दावे करते; पण जमिनीवरची सत्यस्थिती याच्या उलट आहे. ३२० शिक्षक पदे रिक्त म्हणजे हजारो मुलं शिक्षकाविना शिकत आहेत.

ही प्रशासकीय बेपर्वाई मुलांच्या शैक्षणिक हक्काचे उल्लंघन आहे. रिकामे वर्ग समाजाचे भविष्य थांबवतात.” यासोबतच त्यांनी अल्पवयीन मुलांमध्ये वाढत्या गुन्हेगारीशी ढासळत्या शिक्षण व्यवस्थेचा थेट संबंध आहे. “महापालिकेने तातडीने पूर्णवेळ शिक्षक भरती करावी. या संदर्भात आम्ही उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करणार आहोत,” असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुणे महापालिकेच्या शिक्षण व्यवस्थेबाबतची चिंताजनक स्थिती माहिती अधिकारातून समोर आली आहे. महापालिकेच्या अखत्यारित येणाऱ्या ३१३ शाळांमध्ये तब्बल ३२० शिक्षक पदे रिक्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. ‘डिजिटल शाळा’ आणि ‘गुणवत्तापूर्ण शिक्षण’ या सरकारी दाव्यांना छेद देणारी ही आकडेवारी असून, शाळांतील मुलांचे भवितव्य प्रत्यक्षात शिक्षकांविना वर्गांवर उभे असल्याचे चित्र यातून उघड होत आहे.

आम आदमी पक्षाचे शहर उपाध्यक्ष ॲड. कृणाल घारे यांनी महापालिकेच्या शाळांतील शिक्षकांची एकूण पदसंख्या, कार्यरत शिक्षक आणि रिक्त पदांबाबत आरटीआय अर्ज केला होता. त्याला महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी व जनमाहिती अधिकारी स्नेहल उकरंडे यांनी उत्तर दिले. त्यात महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या २३४, इंग्रजी माध्यमाच्या ४६, उर्दूच्या ३१ आणि कन्नडच्या २ अशा एकूण ३१३ शाळा असल्याची माहिती दिली आहे. २,८४२ मंजूर पदांपैकी ३२० पदे रिक्त असल्याचे समोर आले आहे.

महापालिकेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापक : २३३ मंजूर (यापैकी ५७ रिक्त), उपशिक्षक : १,७९० मंजूर (२४ रिक्त), पदवीधर शिक्षक : ८१९ मंजूर (२३९ रिक्त). या सर्व मिळून २,८४२ मंजूर पदांपैकी २,५३८ शिक्षक कार्यरत असून, ३२० पदे रिक्त आहेत. मराठी माध्यमात १४ आणि कन्नड माध्यमात २ उपशिक्षक ‘अतिरिक्त’ असल्याचेही विभागाने नमूद केले आहे. आरटीआयमधून उघड झालेल्या रिक्त पदांवर महापालिकेने प्रतिक्रिया देताना शिक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे म्हणाल्या की, “रिक्त जागांवर करार पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच नियमित भरतीसाठी बिंदुनामावलीची प्रक्रियाही सुरू आहे,” असे त्यांनी सांगितले.

शिक्षण हक्कावरच संकट? पुण्यातील महापालिकेच्या शाळा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील हजारो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा आधार आहेत. मात्र शिक्षकांच्या कमतरतेमुळे अध्यापनाची गुणवत्ता घसरत आहे. अनेक वर्गांमध्ये नियमानुसार शिक्षक उपलब्ध नसल्याने शिक्षणाचा मूलभूत हक्कच धोक्यात आल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# क्षीरसागर यांना सामाजिक कार्य पुरस्कार प्रदान



**बनकरफाटा :** महात्मा फुले विचार मंच, महाराष्ट्र राज्य व जुन्नर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय “सर्वजातीय वधू-विवाह परिचय मेळावा” आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील मान्यवरांचे सन्मान कार्यक्रम रविवारी कला सागर मंगल कार्यालयात झाला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ११ मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी खासदार अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, अनिल मेहेर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, सुखदेव बनकर, नारायणगावचे सरपंच शुभदा वाव्हळ, उपसरपंच योगेश पाटे, वारूळवाडीचे सरपंच विनायक भुजबळ, नेताजी डोके, प्राचार्य मिलिंद कसबे, जुन्नर तालुका नाभिक संघटना अध्यक्ष अरुण क्षीरसागर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सुभाष डोके आदी उपस्थित होते. यावेळी नाभिक समाजाचे लोकप्रिय कार्यकर्ते गणपत क्षीरसागर यांचा उत्कृष्ट सामाजिक कार्यासाठी पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. तसेच, सामाजिक कार्यकर्ते दिनकर गोविंद बाप्ते, तसेच शरदचंद्र माळी, विनायक भागवत, अशोक गांधी, रमेश खोल्लम, विजय चौधरी, डॉ. सदानंद राऊत, संजय नेवासकर, अब्दुल कुरेशी, अनुष्का दरेकर यांनाही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष सचिन वऱ्हाडी, उपाध्यक्ष संतोष भुजबळ, कार्याध्यक्ष आत्माराम संते, सचिव हेमंत कोल्हे यांनी केले.

## सारांश वृत्त

### नेहरू जयंतीतून मुलांमध्ये संस्कारांची पेरणी : कल्पना हांडे

**पुणे :** "बालदिन हा फक्त उत्सव नसून मुलांच्या सर्वांगीण विकासाची आठवण आहे. प्रत्येक मुलामध्ये अपार क्षमता दडलेली असते. योग्य संस्कार, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि प्रोत्साहन मिळाले तर हीच मुले उद्याचे सक्षम नागरिक आणि देशाचे भविष्य घडवतील," असे मत छावा संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षा अध्यक्षा कल्पना हांडे यांनी व्यक्त केले. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्या हांडेवाडी (ता. हवेली) येथील शाळेमध्ये कल्पना हांडे यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सचिन हांडे, माऊली हांडे, सोनाली गिरी, मोनिका साळुंखे, शुभांगी सुतार, रेखाताई कासार, उपशिक्षिका प्रियंका गायकवाड, राजकन्या शिंदे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर मुलांना खाऊ वाटप करून त्यांचा आनंद अधिक वृद्धिंगत करण्यात आला.

### विहिरीत पडलेल्या बैलाची सुखरूप सुटका

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील चऱ्होली बुद्रुक येथील वडमुखवाडी भागातील तापकीरनगर परिसरात एका विहिरीत बैल पडल्याची माहिती महापालिकेच्या अग्निशमन विभागाला मिळाली होती. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या चोवीसवाडी उप-अग्निशमन केंद्रातील पथकाने घटनास्थळी धाव घेत विहिरीमध्ये पडलेल्या बैलाला स्थानिकांनी बोलविलेल्या क्रेनच्या व स्थानिक मदतीला धावून आलेल्या नागरिकांच्या सहाय्याने बाहेर काढत त्याचे प्राण वाचवले. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. अग्निशमन विभागाच्या पथकाने घटनास्थळी गेल्यानंतर विहिरीमधून बैल बाहेर काढण्यासाठी स्थानिकांनी क्रेन बोलवली. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने आणि स्थानिकांच्या मदतीने पथकाने बचावकार्य सुरू केले.

### ओतूरच्या डोमेवाडीत शेतमजुरावर दिवसा बिबट्याचा हल्ला

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील ओतूर हद्दीतील डोमेवाडी, खामुंडी परिसरात दिवसा शेतमजुरावर बिबट्याचा हल्ला घडला. शेतकरी गोरक्षनाथ शेळकंदे हे डोमेवाडी येथील सोमनाथ मंदिराजवळील शेतात काम करत होते. लघुशंकेसाठी शेताच्या बाजूला गेलेल्या शेळकंदेंवर झाडी झुडपात दडलेले बिबट्याचे पिल्लाने अचानक हल्ला केला, ज्यात ते किरकोळ जखमी झाले.
घटना १८ नोव्हेंबर रोजी सकाळी सव्वादहा वाजताच्या सुमारास घडली. जखमी शेळकंदेंनी मोठ्याने आरडाओरडा केल्याने शेजारील शेतकरी व नागरिक घटनास्थळी आले, परंतु बिबट्याने धूम ठोकल्यामुळे गंभीर जीवितहानी टळली. जखमी व्यक्तीस ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले गेले.

# बाजार समितीने शासनाला दिला 'ठेंगा'

## अहवाल द्यायला वेळ संपली, कारवाईची सावली!

**पुणे : पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने विधानसभेत झालेल्या चर्चा आणि शासनाच्या आदेशांनंतरही केराची टोपली दाखवत अहवाल सादर केला नाही. आमदार सदाभाऊ खोत यांनी बाजार समितीवरील गैरव्यवहार उठवला, त्यानंतर शासनाने तब्बल अर्धा तास चर्चा करून ठोस कारवाईची हमी दिली होती.**



पणन मंत्री जयकुमार रावल यांनी फुलबाजारातील प्रतिक्षा यादी रद्द करणे, टपऱ्यांचे वाटप आणि पेट्रोल पंपाचे ठेके विना निविदा रद्द करणे तसेच दोषींवर उच्चस्तरीय चौकशी समितीद्वारे कारवाई करणे याची घोषणा केली होती. तरीही अहवाल अद्याप सादर झाला नाही.

यावर ताबडतोब कारवाई करत, पणनचे सहसंचालक राजेंद्रकुमार दराडे यांनी जिल्हा उपनिबंधकांना २ दिवसांत, तर बाजार समितीला ७ दिवसांत अहवाल सादर करण्याचे कडक आदेश दिले आहेत. अहवाल सादर न केल्यास कडक कारवाई होणार असल्याचे स्पष्ट इशारा देखील देण्यात आला आहे.

दराडेंच्या आदेशानुसार, विद्यमान संचालक मंडळाने ठरावाद्वारे दिलेले वाहनतळ, सुरक्षा एजन्सी, मनुष्यबळ पुरवठा अशा सर्व ठेके रद्द करून आवश्यक ते ठेके ई-निविदेत राबवावे. तसेच, मंडळाने वाटप केलेले स्टॉल, टपऱ्या, गाळे, मोकळ्या जागा आणि पेट्रोल पंप रद्द करणे, अनधिकृत बांधकाम काढून टाकणे आणि शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी विक्री प्रक्रियेत सुधारणा करणे आवश्यक आहे.

शासनाने स्पष्ट केले की विक्री लिलावातून शेतकऱ्यांचे माल दुबार विक्री होऊ नये, विना अनुज्ञप्ती व्यवहार बंद करावे, ठरविलेल्या विभागातच विक्री होईल आणि ई-निविदा प्रक्रियेत सर्व सामान्य अटी लागू कराव्यात. अतिरिक्त नोकर भरती झाली असल्यास ती रद्द केली जाईल. अहवाल सादर होतो की नाही, बाजार समिती शासनाच्या आदेशांचे पालन करते की नाही, हे आता सर्वांच्या लक्षात येणार आहे. शेतकऱ्यांचा हक्क आणि बाजार समितीची हठधार वृत्ती यामध्ये आता कारवाईची सावली उभी आहे, आणि पुढील घडामोडी देशभरात चर्चेचा विषय ठरणार आहेत.

# मतदानासाठी जनजागृती त्वरित, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करा

## आयुक्त श्रावण हर्डीकर यांचे आदेश

**पिंपरी :** आगामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीसाठी प्रशासनाला कडक सूचनांचा दिल्या आहेत.मतदान केंद्रांची स्थळनिश्चिती, अपंगजनांसाठी सुविधा, मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, ईव्हीएमची सुरक्षितता आणि मतदार यादी अद्ययावत ठेवणे यावर विशेष भर देण्याचे आदेश आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त, सहायक आयुक्त, मुख्य अभियंता, शहर अभियंता, आरोग्य अधिकारी, स्मार्ट सिटी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी आणि महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. आयुक्त हर्डीकर म्हणाले की, नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती वाढवणे आणि तक्रार निवारण यंत्रणेला अधिक सक्षम बनवणे. सर्व प्रभागांना अवैध होर्डिंग तातडीने हटवण्याची, वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या



बोर्डांवर तत्काळ कारवाई करण्याची सूचना देखील त्यांनी दिली.बैठकीत महापालिकेच्या दैनंदिन सेवा, स्वच्छता, खड्डेमुक्ती मोहिम, मास्टर प्लॅन अंतर्गत सुरू असलेली विकासकामे, रस्ते प्रकाशयोजना, जलपुरवठा व ड्रेनेज यंत्रणेची स्थिती याबाबतही सखोल चर्चा करण्यात आली. आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रलंबित कामे त्वरित पूर्ण करण्याचे आणि विभागांमधील समन्वय राखण्याचे कठोर निर्देश दिले. महापालिकेची मूलभूत सेवा सुधारताना नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभागी बनवणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

# केंद्र सरकारची बिबट नसबंदीस मान्यता : मंत्री गणेश नाईक

**शिक्रापूर :** मानव बिबट संघर्ष कमी करण्यासाठी प्रस्तावित कामांकरिता लागणारा निधी व त्यासाठी प्रस्तावाची मागणी तात्काळ सादर करावी. तसेच, कृत्रीम बुद्धीमतेवर आधारित एआय तंत्रज्ञानाचा वापर व जागतिक स्तरावरील सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात तसेच बिबट नसबंदीबाबत केंद्राची मान्यता प्राप्त झाली असून त्याबाबतची कार्यवाही करावी, असे आदेश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले आहे.



पुणे येथील वनसंरक्षक यांच्या सभागृहात मानव बिबट संघर्ष उपाय योजनांबाबत आयोजित बैठक आयोजित केले होती. याप्रसंगी सामाजिक वनीकरणाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, मुख्य वनसंरक्षक आशिष ठाकरे, वनसंरक्षक पुणे वनवृत्त महादेव मोहिते, उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, श्रीधर्मबीर सालचिठठल, विवेक होशिंग, उपवनसंरक्षक जयराम गौडा, कुलराज सिंह, सिध्देश सावडेकर, पंकज गर्ग उपस्थित होते. मंत्री नाईक म्हणाले की, मानव बिबट संघर्षाबाबत वनकर्मचारी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करीत असून त्यांना आवश्यक साहित्य पुरविण्यात यावे, जिल्हा योजनेमधून आकस्मिक निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे. बांबू लागवड करुन बिबटला अटकाव करता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करावा. यावेळी साखर कारखान्यांनी करावयाची कार्यवाही, टायगर फाऊंडेशनवर आधारित नियोजन तसेच बिबट्यांची गणना करणे, बिबट्यांचे मायक्रोमॅपिंग, पोल्ट्री वेस्ट तसेच हॉटेल वेस्टची विल्हेवाट, रेस्क्यू सदस्यांचा विमा काढणे, बेस कॅम्पचे सक्षमीकरण करणे, कुरण विकास करून बिबट्यांकरीता अधिवास तयार करणे, मेंढपाळ, ऊस कामगार आदीकरिता विविध उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. दरम्यान, उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांनी मानव बिबट संघर्षाबाबत केलेल्या उपाय योजना बाबतचे सादरीकरण केले.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा महत्त्वाची

## स्नेहल शेळके : समर्थमध्ये 'अविष्कार २०२६' स्पर्धा उत्साहात

**बनकरफाटा :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा महत्त्वाची आहे. "विद्यार्थी हा स्पर्धेतूनच घडतो. स्पर्धा ही त्याच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त स्पर्धांत सहभाग घ्यावा." स्पर्धा ही त्यांच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त स्पर्धांत सहभाग घ्यावा, असे मत माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके यांनी व्यक्त केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ, लोणेरे तसेच समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूटच्या संयुक्त विद्यमाने समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथे पुणे–मुंबई विभागीय 'अविष्कार २०२६' स्पर्धेचे आयोजन केले होते.. सरस्वती पूजन आणि बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. या स्पर्धेमध्ये फार्मसी आणि इंजिनिअरिंग शाखेतील १३५ विद्यार्थी–विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त नोंदवला.

याप्रसंगी विद्यापीठाचे डीन डॉ. विशाल पांडे व आविष्कार समन्वयक डॉ. संजय खोब्रागडे, नारायणगाव, मंचर, बोटा, कर्जुले हर्या, संगमनेर, इंदापूर आणि पुणे येथील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य या स्पर्धेसाठी विशेष उपस्थित होते. यावेळी मानव्यशास्त्र–भाषा–ललित कला, वाणिज्य–व्यवस्थापन–कायदा, शुद्ध विज्ञान, कृषी–पशुसंवर्धन, अभियांत्रिकी–तंत्रज्ञान आणि औषध–फार्मसी या विभागांनुसार प्रथम, द्वितीय व तृतीय असे विजेते विद्यार्थी जाहीर करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

परीक्षक म्हणून डॉ. श्रीकांत स्वामी, डॉ. धनेश पडवळ, डॉ. उर्मिला सुखदेवे, डॉ. अनिता सावळे, डॉ. संजय खोब्रागडे, डॉ. प्रतिमा पडघन, डॉ. संगिता मेटकर, डॉ. दीपाली धिवरे, डॉ. पवन पाईकराव, डॉ. धनश्री बिरादार, डॉ. धैर्यशील घाडगे, डॉ. शैलजा जाधव आणि डॉ. मनोज गाढवे यांनी काम पाहिले.

प्रा. डॉ. सचिन भालेकर, प्रा. डॉ. राहुल लोखंडे, प्रा. डॉ. विजयकुमार वाकळे, प्रा. सागर तांबे, प्रा. श्रद्धा खळदकर, प्रा. काजल वाळुंज, समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्रा. निर्मल कोठारी, प्रा. प्रियांका लोखंडे तसेच फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जि. प. सदस्य स्नेहल शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, फार्मसी प्राचार्य डॉ. कुलदीप रामटेके, कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. संतोष घुले, इंजिनिअरिंग–मॅनेजमेंट प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे आणि प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदिप गाडेकर यांनी विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रा. प्राची पडवळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कुलदीप रामटेके यांनी आभार मानले.

# राष्ट्रवादीच्या पिंपरी-चिंचवड शहर समन्वयकपदी विलास लांडे तर, कार्याध्यक्षपदी विजय लोखंडे

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते सत्कार

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला पुन्हा काबिज करण्याकरिता व तो अधिकाधिक मजबूत रहावा या दृष्टीकोनातून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात राज्यात होणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणकांच्या दृष्टीने जिल्हा समन्वय व नियोजन करण्याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे पिंपरी चिंचवड शहराकरिता माजी आमदार विलास लांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



तसेच माजी सभापती, शिक्षण मंडळ विजय लोखंडे यांची पिंपरी–चिंचवड शहर कार्याध्यक्ष पदी नियुक्ती केली आहे. पिंपरी–चिंचवड महानगरपालिका २०२५-२६ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या अतिशय महत्त्वपूर्ण जबाबदारीसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब व खासदार सुनील तटकरे यांचे व पक्षाचे विचार समाजातील तळागाळापर्यंत पोहचविण्याचे यशस्वी प्रयत्न करतील असे नियुक्तीची माहिती देताना शहराध्यक्ष योगेश बहल यांनी विश्वास व्यक्त केला आहे. तसेच यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहे. माजी आमदार विलास लांडे आणि शिक्षण मंडळाचे माजी सभापती विजय लोखंडे यांनी पक्षवाढीसाठी काम करणार असल्याचे सांगितले.

# बिबट्याचा बंदोबस्त न केल्यास तीव्र आंदोलन - रमेश थोरात

**दौंड :** दौंड तालुका आणि परिसरामध्ये बिबट्याचा उपद्रव वाढला असून, मानव पशुधनाची मोठी हानी होत आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दौंडचे माजी आमदार रमेश थोरात यांनी निवेदनद्वारे दिला आहे. थोरात यांनी दौंडचे तहसीलदार यांना निवेदन दिले.

थोरात यांनी निवेदनात म्हटले आहे की, मागील काही वर्ष बिबट्याचा धुमाकूळ दौंडमध्ये सुरु आहे. बिबट्याच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे पशुधन मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. बिबट्याने अनेक वेळा माणसांवरही हल्ले केलेले आहे. यामुळे जीवित हानीही झालेली आहे. यामुळे शेतकरी आणि शेतमजूर भीतीच्या छायेखाली वावरत आहेत. मागील काही दिवसात बिबट्याच्या हलल्यात मृत पावलेल्या पशुधनाची नुकसान भरपाई अद्याप शेतकऱ्यांस मिळालेली नाही. यामुळे नुकसान ग्रस्त शेतकरी आणि वन कर्मचारी आणि अधिकारी यांचेत वाद होत आहेत. तालुक्यातील अनेक गावात विशेषतः नदीलगतच्या गावातून बिबट्याची दशहत पसरली आहे. लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींचा बिबट्याने बळी घेतला आहे. बिबट्याच्या भीतीने शेतकरी शेतात जा ये करण्यास तसेच शेतात महिला मजूर येण्यास टाळत आहे.

सतत भीतीच्या छायेत वावरावे लागत आहे. याबाबत तालुका वन अधिकारी गांभीर्याने पाहात नाहीत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५२ ( फ ) मधील तरतुदीनुसार बिबट्यासारखा दहशतवादीप्राणी नष्ट करावा. बंदिस्त करावा अगर त्याची योग्य ती विल्हेवाट लावावी, असे म्हटले आहे. नागरिकांना संविधाना नुसार भयंमुक्त जगण्याचा अधिकार पुन्हा मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# कोरेगाव भीमा सोहळ्याच्या बससेवेचे ६ कोटी अडकले

**पुणे : 'गेल्या वर्षी कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक स्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी उपलब्ध करून दिलेल्या बससेवेचे ६ कोटी रुपये देण्यात यावेत,' अशी मागणी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेकडे (बार्टी) केली आहे. 'याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविला असून, मंजुरी मिळताच देयकाची रक्कम देण्यात येईल,' असे उत्तर 'बार्टी'ने दिले आहे.**

कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक स्तंभाला अभिवादन करण्यासाठी शहर, पिंपरी-चिंचवड, ग्रामीण भागासह राज्यभरातून मोठ्या प्रमाणात अनुयायी येतात. त्यांना कोरेगाव भीमा येथे जाण्यासाठी 'पीएमपी'ची सेवा उपलब्ध करून देण्यात येते. 'पीएमपी'ने गेल्या वर्षी ३१ डिसेंबर २०२४ रोजी दुपारपासून आणि एक जानेवारी रोजी लोणीकंद, शिक्रापूर या मार्गापर्यंत विनाशुल्क सेवा उपलब्ध करून दिली होती. त्यासाठी टप्प्यानुसार सुमारे ५०० बस उपलब्ध करून देण्यात आल्या. याची देय रक्कम सहा कोटी रुपये झाली आहे.

### पीएमपीची बार्टीकडे धाव : पीएमपीच्या बससेवेचे ६ कोटी देयक प्रलंबित

'पीएमपी'चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे म्हणाले, 'गेल्या अनेक वर्षांपासून 'पीएमपी'चे आर्थिक गणित कोलमडले आहे. या वर्षी वित्तीय तूट वाढली आहे. ही तूट कमी करण्यासाठी पीएमपी प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहे. त्याचाच भाग म्हणून कोरेगाव भीमा ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या सेवेसंदर्भात 'बार्टी'ला पत्र पाठवून देयक मिळावे, अशी मागणी केली आहे.' दरम्यान, कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक स्तंभाच्या अभिवादन सोहळ्याची पूर्वतयारी करण्यास सुरुवात झाली आहे. अभिवादन करण्यासाठी दूर-दूरवरून येणाऱ्या अनुयायांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर नियोजनासंदर्भात बैठका घेण्यात येत आहे. विभागीय आयुक्त विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, शहर आणि ग्रामीण पोलीस, वाहतूक विभाग, पीएमपी, समाज कल्याण, बार्टी आणि इतर विभागांकडून नियोजन करण्यात येत असून, यंदाचा सोहळा उत्साहात पार पाडण्यासाठी सामाजिक संस्था देखील उत्साहाने सहभागी होताना दिसून येत आहे, असे त्यांनी सांगितले.

> कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी अनुयायांना सुलभ सेवा मिळावी, म्हणून 'पीएमपी'कडून सेवा घेण्यात येते. गेल्या अभिवादन सोहळ्यासंदर्भातील देयकाबाबत 'पीएमपी'चे पत्र प्राप्त झाले आहे. याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सरकारकडून मंजुरी मिळताच देयक दिले जाईल.
>
> –सुनील वारे, महासंचालक, बार्टी

# संजीवन समाधी – चैतन्याचा अखंड दिव्यास्पर्श

## संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाला दिशा देणारा; पुण्यतिथीनिमित्त लाखो भक्त आळंदीमध्ये भाविकतेने नतमस्तक

**पुणे :** आळंदीच्या इंद्रायणी तीरावर उभं राहिलं की मनात एक अनाहूत शांततेची लहर उसळते. कार्तिक वद्य त्रयोदशी—संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीचा पावन दिवस—हा केवळ स्मरणदिन नाही, तर नवचैतन्याचा, अध्यात्माचा आणि मानवतेचा दिव्योत्सव आहे. ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रकाशाचा अविरत प्रवाह. समाजाने केलेल्या अन्यायांच्या जखमा छातीवर घेऊनही त्यांनी कटुतेला कधीही आसरा दिला नाही. करुणा, सत्य आणि समतेचा महामार्ग



त्यांच्या जीवनाने दाखविला.

नेवासे येथे त्यांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी ही मराठी संस्कृतीची अतिशय अमूल्य देणगी. संस्कृतच्या गुंतागुंतीतील गीतेचे तत्त्वज्ञान अत्यंत सुलभ, रसाळ आणि सर्वसामान्यांच्या जीवनात उतरवणारे हे अपूर्व कार्य आजही मार्गदर्शक दीपस्तंभाप्रमाणे उजळत आहे. ज्ञान, भक्ती आणि कर्म या तीनही योगांची सांगड घालत त्यांनी समाजाला संतुलित जीवनाचं सूत्र दिलं.

ज्ञानदेवांची समाधी ही सामान्य अर्थाने समाधी नाही; ती चैतन्याचा विस्तार आहे. नामदेवांनी वर्णन केलेल्या प्रसंगात भक्तीचा उत्कट वेदना, आत्मसमर्पणाची पराकाष्ठा आणि भावंडांचे प्रेम या सगळ्यांची एकत्र छटा दिसते. तरीही ज्ञानदेवांचा निर्णय 'वैराग्याचा' नव्हता; तो 'विश्वकल्याणाच्या चैतन्याचा आरंभ' होता. आज लाखो वारकरी परंपरेपोटी नव्हे, तर या दिव्य समाधीच्या तेजाकडे आकृष्ट होऊन आळंदीला दाखल होतात. "ज्ञानोबा माउली तुकाराम" या नामसमाधीतील ऊर्जा तर्काच्या पलीकडे आहे. तणाव, स्पर्धा आणि स्वार्थाच्या आजच्या काळात ज्ञानदेवांचे विचार अधिकच उपयुक्त ठरतात. त्यांच्या शिकवणीतून मनाला मृदुता, आचरणाला सात्विकता आणि समाजाला एकात्मता मिळते.

ज्ञानदेवांचा साधेपणा, कर्मठता आणि निःस्वार्थ सेवा ही तरुण पिढीसाठी आजही मार्गदर्शक आहेत. संजीवन समाधी ही देहाची नाही; ती विचारांची आहे. ती स्मृतीची नाही; ती प्रेरणेची आहे. या समाधीपुढे नतमस्तक होताना जाणवतं—ज्ञानदेव कधीच लोप पावले नाहीत... ते प्रेम, समता आणि चैतन्याच्या रूपानं आजही जिवंत आहेत.

## थोडक्यात

### अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणारा अटकेत

**बनकरफाटा :** अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्यावर ओतूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. देवीदास रोहीदास गर्जे (सध्या रा. नेतवड, ता.जुन्नर, जि. पुणे, मुळ रा. बडेवाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले की, पीडित मुलीची पुणे येथील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी कामी दाखल करण्यात आले आहे.

### सणसवाडीतील सुरक्षारक्षकांनी मारला १७ लाखांच्या लॅपटॉपवर डल्ला

**शिक्रापूर :** सणसवाडी (ता. शिरुर) येथील किंबर्ली क्लार्क कंपनीमधील सुरक्षारक्षकांनी कंपनीच्या स्टोअर रूममधील तब्बल अठरा लॅपटॉप चोरून नेल्याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. विराज वादाने व पुरुषोत्तम बनसोडे अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. याप्रकरणी अनसेक एच आर सर्विस लिमिटेड सेक्युरिटी एजन्सी कंपनीचे विभाग प्रमुख बालकिशन टेकचांद शेरावत यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे हे करत आहेत.

### भरधाव ट्रकखाली चिरडून एकाचा मृत्यू

**शिक्रापूर :** सणसवाडी (ता. शिरुर) येथील पुणे-अहिल्यानगर महामार्गावर भरधाव ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यू झाला. कैलाश शेषराम कुमार (सध्या रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे, मूळ रा. बेरामी ता. सुमेपूर जि. पाली राजस्थान ३०६११५) असे अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव आहे. कैलाश कुमार रस्ता ओलांडत असताना पुणे बाजूने अहिल्यानगरच्या दिशेने जाणाऱ्या एम एच १४ के ए ७१९१ या ट्रकची त्यांना जोरात धडक बसली. त्यामुळे ते रस्त्यात पडल्याने ट्रकखाली चिरडले गेले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# हसीना यांना शिक्षा, ढाकामध्ये 'हिंसेचा भडका'!

**लोक रस्त्यावर उतरले ; हसीना यांच्या कारकिर्दीतील गंभीर आरोपांवर, विशेषतः मानवतेविरुद्धचे गुन्हे सिद्ध**



**नवी दिल्ली :** बांगलादेशच्या राजकारणात सध्या ऐतिहासिक आणि अनेक दिशात्मक राजकीय चढ-उतार दिसून येत आहेत. देशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने सोमवारी मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे.

हसीना यांच्या कारकिर्दीतील गंभीर आरोपांवर, विशेषतः मानवतेविरुद्धचे गुन्हे सिद्ध ठरल्याने हा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय देण्यात आला आहे. न्यायाधिकरणाचे तीन-सदस्यीय खंडपीठ, ज्याचे नेतृत्व मुख्य न्यायाधीश गोलम मुर्तुजा मोझुमदर यांनी केले, त्यांनी हा निकाल दिला.

न्यायाधिकरणाने स्पष्ट केले की, माजी पंतप्रधान हसीना २०२४ च्या जुलै-ऑगस्ट महिन्यात विद्यार्थी नेतृत्वाखालील जनआंदोलन दडपण्याच्या कारवाईत सहभागी होत्या. निकालपत्रात नमूद केल्याप्रमाणे, शेख हसीना यांनीच या आंदोलन दडपण्याचे प्रत्यक्ष आदेश दिले होते आणि त्या "किलोसंचलनात नेतृत्व" करत होत्या. म्हणजेच, विद्यार्थी आंदोलकांवरील गोळ्या-गोळीबाराच्या मागे त्या प्रमुख व्यक्ती होत्या, हे न्यायाधिकरणाने स्पष्टपणे नमूद केले.

बांगलादेशच्या ६० वर्षांहून अधिक वर्षांच्या राजकीय इतिहासातील हा एक अभूतपूर्व निर्णय मानला जात आहे, ज्यामुळे देशाच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. माजी पंतप्रधान शेख हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावताना आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणा अत्यंत गंभीर निरीक्षणे नोंदवली आहेत. न्यायालयाच्या निर्णयानुसार, हसीनाने हे हिंसक आदेश केवळ तोंडी दिले नाहीत, तर त्यासाठी हवाई वाहने, हेलिकॉप्टर, ड्रोन आणि विविध घातक शस्त्रांचा वापर करण्यात आला. या कृतीतून देशभरात मोठ्या प्रमाणावर मृत्यू आणि हिंसा पसरली, असे न्यायालयाने ठामपणे म्हटले आहे.

शेख हसीना यांच्यावर न्यायालयात पाच वेगवेगळे आरोप सिद्ध झाले आहेत, ज्यात खून, प्रयत्न खून, यातनादायक वर्तन आणि इतर मानवी हक्कांचे उल्लंघन यांचा समावेश आहे.

या खटल्यात हसीना यांच्यासोबत त्यांचे दोन मोठे सहकारीदेखील दोषी ठरले आहेत: माजी गृहमंत्री असदुज्जमान खान कमाल आणि माजी पोलिस प्रमुख चौधुरी अब्दुल्ला अल-मामुन. तथापि, एका महत्त्वपूर्ण घडामोडीत, अल-मामुन यांना मृत्युदंडापासून सवलत मिळाली आहे, कारण त्यांनी तपासात पूर्ण सहयोग केला आणि ते "स्टेट विटनेस" (सरकारी साक्षीदार) बनले. या संपूर्ण निकालामुळे बांगलादेशच्या राजकारणात आणि प्रशासकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटले आहेत.

# ट्रम्प नरमल्याने भारताच्या नऊ हजार कोटींच्या कृषी निर्यातीचा

**नवी दिल्ली :** परराष्ट्रनीतीला उभा राहिलेला आत्मविश्वास अमेरिकेच्या राजकारणात एक सत्य कायम असतं, तिथे कुणीही कायम हुकमी बादशाह नसतो. महागाईची आग उसळली की वॉशिंग्टनमधील गर्विष्ठ राजकारणाचे किल्लेही क्षणात वाळूचे ठरतात. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आर्थिक राष्ट्रवादाचे बुरखे काही असेच फाटत आहेत. भारतावर 'रशियन तेल' खरेदीबद्दल दंडात्मक कराची काठी उगारणाऱ्या अमेरिकेने अखेर मागे वळून पाहिले आणि भारताच्या तब्बल नऊ हजार कोटी रुपयांच्या कृषी निर्यातीला करमुक्तीचा दरवाजा उघडला.

प्रश्न असा—हे माघार घेणे अमेरिकेचे उदात्तपण दाखवते का? की अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची पोकळी? सत्य इतकं सोपं आहे की, अमेरिकेत अन्नधान्याची महागाई डोक्यावर पोहोचली आहे. स्थानिक बाजारपेठ संतापलेली आहे. निवडणूक समीकरणांमध्ये अन्नकिंमतीचा प्रश्न स्फोटक ठरावा, इतकी परिस्थिती बिकट आहे. आणि अमेरिकेच्या राजकारणात 'मतदार' हाच अंतिम न्यायाधीश. त्यामुळे भारतावर करवजा सूड उगवण्याचा ट्रम्पांचा सपनाप्रकल्प शेवटी त्यांच्या स्वतःच्या घराच्या पडवीतच धडाधडा कोसळला. भारताशी पंगा घेणे अमेरिकेला एवढे महाग का पडले? कारण भारत आता १९७०-८०च्या काळातील अविचारी, बचावात पळणारा देश राहिलेला नाही. नवीन भारत स्वतःच्या परराष्ट्रनीतीवर दृढ उभा आहे, रशियाशी तेल व्यापार हा भारतीय हिताचा प्रश्न आहे—हे दिल्लीने अमेरिकेला स्पष्ट सांगितले. आणि महत्त्वाचे म्हणजे, भारताची जागतिक बाजारपेठेतील वाढती ताकद अमेरिकेलाही माहित आहे

कॉफी, चहा, मसाले, उष्णकटिबंधीय फळे, प्रक्रिया अन्नपदार्थ—या सर्व क्षेत्रांत अमेरिकेला भारताची गरज होती. ट्रम्पांनी कर लादला, पण त्यामुळे अमेरिकन बाजारात वस्तू महागल्या. शेवटी स्वतःच्या नागरिकांच्या संतापापुढे ट्रम्पांना गुडघे टेकावे लागले. हे पराभवाचे नव्हे, तर एक राजनैतिक सत्याचे मान्यतेचे चिन्ह आहे. नऊ हजार कोटींची मोकळीक : फक्त आकडा नाही, तर संदेश डीजीएफटीचे म्हणणे अतिशय नेमके आहे—भारतीय निर्यातदारांना आता "समान संधी" मिळेल. काहींना हा वाक्यांश साधा वाटेल; पण जागतिक व्यापारव्यवस्थेत हेच संपूर्ण खेळाचे नियम बदलते. मसाले – रु३,२०० कोटी, प्रक्रिया अन्न – रु४,३४५ कोटी, चहा- कॉफी – रु७३१ कोटी, फळे-काजू – रु.४८४ कोटी. या सर्व निर्यातीवर असलेला करवजनी अंत आता संपला आहे. हे केवळ आर्थिक नाही; तर भारताने जागतिक व्यापारात आपले स्थान ठोसपणे रोवले याचा पुरावा आहे. भारत-अमेरिका व्यापार करार : निर्णायक बिंदूवर वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितलेले संकेत महत्त्वाचे आहेत. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार आता अंतिम टप्प्यात आहे. ही केवळ कागदी चर्चा नाही; तर जागतिक अर्थव्यवस्थेतल्या दोन महत्त्वाच्या खेळाडूंमध्ये होणारी नवी

# पालघर साधू हत्याकांड प्रकरणात आरोप झाल्याने भाजप प्रवेश स्थगित

**मुंबई :** पालघर साधू हत्याकांड प्रकरणात भाजपने मागील काळात काशिनाथ चौधरी यांच्यावर गंभीर आरोप केले होते. त्यातच भाजपमध्ये काशिनाथ चौधरी यांना प्रवेश देण्यात आला. यामुळे राज्यभरातून विरोधकांकडून गंभीर आरोप करत भाजप टीकेची झोड उठवली. यानंतर विरोध लक्षात घेता भाजप पक्षश्रेष्ठींनी काशिनाथ चौधरी यांच्या भाजप पक्षप्रवेशाला स्थगिती दिली. या पार्श्वभूमीवर काशिनाथ चौधरी यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी बोलताना काशिनाथ चौधरी चांगलेच भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

काशिनाथ चौधरी म्हणाले की, प्रसार माध्यमांवर येणाऱ्या बातम्यांमुळे माझ्या कुटुंबाला प्रचंड मानसिक त्रास झालाय. समाज माध्यमांवर प्रतिमा मलीन केली जात आहे. आमचं जगणं मुश्किल केलेलं आहे. व्यक्तिगत मी सगळं सहन केला असतं. मी अत्यंत संघर्षातून आलेला कार्यकर्ता आहे. अत्यंत प्रामाणिकपणे काम करत आहे. या राजकारणासाठी माझं राजकीय करिअर उद्ध्वस्त झालं तरी चालेल. परंतु यात माझे कुटुंब, माझी मुलं भरडले जात आहेत. मी सगळ्यांना हात जोडून विनंती करतोय की, मी पोलिसांच्या मदतीसाठी गडचिंचले येथे गेलो होतो. मात्र मलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करण्यात आलं. साधूंचा जीव वाचावा म्हणून पोलिसांनी मला तिथे नेलं. मात्र, जमाव इतका आक्रमक होता की आम्हाला तो सांभाळात आला नाही. कृपया यात वेगळा रंग देण्याचा कोणीही प्रयत्न करू नका, असे म्हणत त्यांना अश्रू अनावर झाले.

# डेक्कन जिमखाना परिसरात दागिने चोरी

**पुणे :** मोटार चालकाचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्यांनी एक लाख १५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविल्याची घटना डेक्कन जिमखाना भागात घडली. याबाबत एका महिलेने डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला मूळच्या शिरुर तालुक्यातील केंदूर गावच्या रहिवासी आहेत. त्या कुटुंबीयांसोबत डेक्कन जिमखाना परिसरातील एका हॉटेलमध्ये आल्या होत्या. मोटार त्यांनी हॉटेलच्या परिसरात लावली होती. त्यावेळी मोटार चालकाचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्यांनी मोटारीत ठेवलेले एक लाख १५ हजार रुपयांचे दागिने चोरुन नेल्याची घटना घडली. सहायक फौजदार डेंगळे तपास करत आहेत.

# ऑफ्रोहचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**अप्पर विभागीय आयुक्तांना दिले विविध मागण्यांचे निवेदन**

**पुणे :** अधिसंख्य अधिकारी-कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, आदिवासी समाजावरील अन्याय तातडीने थांबवावा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करावी या प्रमुख मागण्यांसाठी ऑफ्रोहतर्फे पुणे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात ऑफ्रोहचे कार्यकारी राज्याध्यक्ष राजेश सोनपरोते, महिला आघाडीच्या उपाध्यक्षा भारतीताई धुमाळ, पुणे विभागीय अध्यक्ष अभय जगताप, पुणे जिल्हाध्यक्ष राजेंद्र बेसके, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा पुष्पा किटाडीकर, जिल्हा सचिव सौ. लीना पवार, सुधाकर सुसलादिया यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि सभासद उपस्थित होते.



अप्पर विभागीय आयुक्त स्वाती देशमुख-पाटील यांना आफ्रोहच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये पुढीलप्रमाणे मागण्या करण्यात आल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या जगदीश बहीरा प्रकरणातील निर्णयाची राज्यात त्वरित अंमलबजावणी करावी.

शासनाच्या धोरणात्मक निर्णयात अडथळा ठरणारे १८ सप्टेंबर २०२५ चे सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक रद्द करावे. अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना (१०-२०-३०) आणि अनुकंपाचा लाभ द्यावा. अधिसंख्य पदावर वर्ग न केलेल्या पण सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना कुटुंबनिवृत्ती वेतन मंजूर करावे. अधिसंख्य पदावर वर्ग न केलेल्या पण सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना शासन निर्णय ४ ऑक्टोबर २०२४ नुसार पेन्शन आणि तत्सम लाभ द्यावेत. सेवासमाप्त कर्मचाऱ्यांना पुनश्च सेवेत घेऊन वेतननियोजन आणि खंडीत सेवा क्षमापित करावी. २००१ पूर्वी सेवा असलेल्या पण जातवैधता दावे प्रलंबित राहून नंतर अवैध ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना २०१९ आणि २०२४ च्या शासन निर्णयांप्रमाणे लाभ लागू करावेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शिक्षण संस्थांमधील उर्वरित सेवा समाप्त शिक्षक-कर्मचाऱ्यांना पुनर्वसनाच्या प्रक्रियेत समाविष्ट करावे. ऑफ्रोहच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "शासनाने न्यायप्राप्तीसाठी अनेक आदेश काढले, मात्र अंमलबजावणीच्या अभावामुळे हजारो कर्मचाऱ्यांचे भविष्य अडचणीत आहे. शासनाने तात्काळ निर्णय घेत आंदोलनातील सर्व मागण्या मान्य कराव्यात," आदी मागण्यात करण्यात आल्या.

# मुंढवा जमीन प्रकरण! पार्थ पवार अडचणीत?

**दमानिया आक्रमक : "उद्या गौप्यस्फोट, नाहीतर राजीनामा द्या!"**

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीशी संबंधित मुंढवा येथील १८०० कोटींच्या जमीन व्यवहाराने राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. या प्रकरणात शासनाकडून चौकशी सुरू असतानाच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया या आज थेट वादग्रस्त जागेची पाहणी करण्यासाठी मुंढव्यात दाखल झाल्या. मात्र, अधिकाऱ्यांनी परवानगी नसल्याच्या कारणावरून त्यांना आत प्रवेश नाकारल्याने दमानिया संतप्त झाल्या आणि अजित पवारांच्या राजीनाम्याची मागणी करत उद्या "मोठा गौप्यस्फोट" करण्याचा इशारा दिला.

दमानिया म्हणाल्या, "मी लढत असलेल्या प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करते. या जमिनीची वास्तविक स्थिती जाणून घेण्यासाठी आले, पण अधिकाऱ्यांकडून आणि बोटॅनिकल गार्डनच्या संचालकांकडून उद्धट वर्तन करण्यात आले. त्यामुळे आता मी अधिक दस्तऐवजांची पाहणी करून उद्या पत्रकार परिषदेत मोठ्या गोष्टी उघड करणार आहे." "हा व्यवहार रद्द करण्याचा अधिकार अजित पवारांसह कोणालाही नाही", असे दमानियांनी स्पष्ट केले.

दमानिया यांनी जमीन व्यवहार रद्द करण्याबाबत सुरू असलेल्या चर्चेला दमानिया यांनी थेट आव्हान दिले. त्यांनी म्हटले, "हा व्यवहार रद्द करण्याचा अधिकार ना अजित पवारांना, ना देवेंद्र फडणवीसांना, ना पंतप्रधान मोदींनाही आहे. आधी २१ कोटी, नंतर ४२ कोटी देऊन व्यवहार रद्द होणार असल्याची चर्चा झाली. पण हे सर्व कायदेशीरदृष्ट्या चुकीचे आहे." "सरकारने व्यवहार रद्द केला तर मी उच्च न्यायालयात जाईन" "सरकारने हा व्यवहार रद्द केला तर मी त्याला उच्च न्यायालयात आव्हान देणार. सिंचन प्रकरणात आरोप झाल्यावर अजित पवारांनी राजीनामा दिला होता. आजही तेच नैतिक धैर्य दाखवावे."

पार्थ पवारांवर राजकीय 'दबाव' वाढणार? पार्थ पवारांवरील आरोपांनंतर विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, आता दमानिया यांच्या हालचालींमुळे प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता आहे. उद्याच्या पत्रकार परिषदेत कोणते दस्तऐवज आणि माहिती समोर येते, याकडे राज्याचे राजकीय वर्तुळ डोळे लावून बसले आहे.

# पाषाण पुन्हा 'हॉटस्पॉट' नाही तर 'कोल्डस्पॉट'

**पुणे :** शहरात गेल्या काही दिवसांत रात्रीच्या किमान तापमानात सातत्याने घट होत असून, पुणेकरांना गुलाबी थंडीचा चांगलाच अनुभव येत आहे. सोमवारी हिवाळ्यातील आतापर्यंतचे सर्वात कमी तापमान नोंदवले गेले. त्यात पाषाण परिसर सर्वात थंड ठरत ९.८ अंश सेल्सिअसवर पोहोचला, तर शिवाजीनगर येथे १०.२ अंश तापमानाची नोंद झाली.

लोहगाव, चिंचवड, कोरेगाव पार्क या भागांत मात्र तापमान तुलनेने अधिक राहिले. निरभ्र आकाश, हवेत बाष्पाचा अभाव आणि उत्तरेकडून येणाऱ्या गार वाऱ्यांमुळे शहरात थंडीची लाट जाणवत आहे. अनेक ठिकाणी रात्री शेकोट्या पेटवून थंडीपासून बचाव करण्याचे दृश्ये दिसत आहेत.

हवामान विभागाच्या नोंदीनुसार रविवारी आणि सोमवारी तापमानातील घट अधिक स्पष्ट जाणवली. पाषाण व शिवाजीनगर परिसरात झाडांचे प्रमाण अधिक आणि शहरीकरण तुलनेने कमी असल्याने या भागांत तापमान अधिक खाली जाण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली.

दरम्यान, हवामान विभागाने १९ नोव्हेंबरपासून किमान तापमानात वाढ होईल, असा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत थंडीची कडाक्याची तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे. यंदाच्या वर्षी अधिक पावसामुळे आणि दिवाळीनंतर उद्भवलेल्या वातावरणीय स्थितींमुळे हिवाळ्याची सुरुवातच थंडीत झाली असून, पाषाणची नोंद पुन्हा एकदा शहरातील 'सर्वाधिक थंड' ठिकाण म्हणून चर्चेत राहिली आहे.

# त्या गुन्हेगारांना पाताळातून शोधून काढू

**नवी दिल्ली:** दिल्ली बॉम्बस्फोटातील गुन्हेगारांना पाताळातूनही शोधून काढू आणि कठोर शिक्षा करू, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. ते गृहखात्याशी संबंधित उत्तर विभागीय परिषदेच्या ३२ व्या बैठकीत बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात दहशतवादाला मुळापासून नष्ट करण्यासाठी हे सरकार वचनबद्ध आहे, असेही अमित शाह म्हणाले. दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ १० नोव्हेंबर रोजी झालेल्या स्फोटात १५ जणांचा मृत्यू झाला. या घटनेला गेल्या आठवड्यात मंत्रिमंडळाने 'घृणास्पद दहशतवादी हल्ला' म्हणून घोषित केले. तसेच स्फोटात सहभागी असलेल्यांना कठोर शिक्षा केली जाईल अशीही घोषणा केली होती. दरम्यान, राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोटाचा तपास करणाऱ्या राष्ट्रीय यंत्रणेला मोठे यश मिळाले आहे.

# अरे बापरे... ७'७७'७७७ रुपये मोजून भागवली 'सात' क्रमांकाची हौस!


**पुणे :** वाहनांना पसंतीचे 'व्हीआयपी' क्रमांक घेण्याची स्पर्धा दिवसेंदिवस चढत असून, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) नुकत्याच झालेल्या लिलावात एका वाहनधारकाने थेट ७ लाख ७७ हजार ७७७ रुपये मोजून 'सात' (०००७) हा आकर्षक क्रमांक मिळवला. विशेष म्हणजे, बोलीची रक्कमही ७-७७-७७७ अशीच ठेवल्याने संपूर्ण आरटीओमध्ये आणि सोशल मीडियावर या चर्चेला चांगलेच उधाण आले आहे. हौशी वाहनधारकाचे नाव मात्र अद्याप समोर आलेले नाही.

आरटीओकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, या क्रमांकासाठी बोलीची सुरुवात सहाशे रुपयांपासून झाली. टप्प्याटप्प्याने बोली वाढत गेली आणि अखेर ती थेट सात लाखांच्या पुढे जाऊन विक्रमी रकमेवर थांबली. यंदाच्या वर्षातील ही सर्वात मोठी बोली ठरल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. 'तीन' (३३३३) या क्रमांकासाठीही वाहनधारकांनी जोरदार रस दाखवला असून, त्यासाठी साडे-पाच लाखांची बोली लावण्यात आली. वाहनांच्या पसंती क्रमांकांसाठीची उत्सुकता, विक्रमी बोली आणि '७' क्रमांकाचा रहस्यमय हौशी याबाबतची चर्चा आता पुण्यात चांगलीच रंगली आहे.

दरम्यान, पसंतीचे क्रमांक मिळवण्याची ही स्पर्धा सातत्याने वाढत असून, २०२४ मध्ये 'एक' या क्रमांकासाठी तब्बल १८ लाखांची, तर २०२३ मध्ये १२ लाखांची बोली लागली होती. ७, ९, १२, २४, ९०, ९९, १००, १०१, १२१२, २१२१, ७०७०, ९०९० व ९९९९ या क्रमांकांनाही मागणी कायम आहे.

# १८०० कोटींचा जमीन घोटाळा

**गुन्हा दाखल नाही : मुलगा अमित ठाकरेंवरील गुन्ह्याबाबत शर्मिला ठाकरे स्पष्टच बोलल्या**



**मुंबई :** १८०० कोटींचा घोटाळा, पण गुन्हा नाही, अमित ठाकरेंवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यासंदर्भात बोलताना, मला अभिमान आहे, मी पण वाट बघते माझ्यावर कधी केस होते, अशी परखड प्रतिक्रिया शर्मिला ठाकरे यांनी दिली. यांना निवडणुकीसाठी फक्त महाराज पाहिजे, किल्ल्यावर हे नमो सेंटर उभारणार आहेत. किल्ले हायजॅक करण्याचा प्रयत्न आहेत. पण, आम्ही होऊ देणार नाही.

निवडणुकीसाठी यांना केवळ महाराज दिसतात. पंतप्रधान तिथं येऊन गेले, पण त्यांना वेळ शिवरायांच्या पुतळ्याच्या लोकार्पणासाठी वेळ मिळाला नसेल, असे म्हणत लेकावरील दाखल गुन्ह्यासंदर्भात भूमिका मांडली. तसेच, १८०० कोटींचा जामीन घोटाळा होतो, पण गुन्हा दाखल होत नाही, असे म्हणत पार्थ पवार यांच्या जमीन घोटाळ्यावरही त्यांनी भाष्य केलं.

मनसेचे युवा नेते आणि राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरेंवर नवी मुंबईत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या काही महिन्यांपासून धुळ खात पडलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केल्यामुळे अमित ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर आमदार आदित्य ठाकरे आपल्या भावाच्या समर्थनार्थ पुढे आले. शिवाजी महाराजांचा पुतळा चार महिन्यांपासून घाणेरड्या कापडाने झाकून ठेवला होता.

अमितने त्याचे अनावरण करून सन्मान राखला, तरीही त्याच्यावर गुन्हा दाखल करता? असा सवाल आदित्य ठाकरेंनी विचारला. तसेच, ही दादागिरी मोडून काढू असेही त्यांनी म्हटले. आता, लेकावर गुन्हा दाखल झाल्यानंतर आई शर्मिला ठाकरे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली. तसेच, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंतिम सुनावणीला होत असलेल्या विरोधावरुन टीका केली.

### सुप्रीम कोर्टात निकाल लागत नाही

मला सुप्रीम कोर्टालाही प्रश्न विचारायचा आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीची केस तीन वर्षांपासून सुरू आहे. सुप्रीम कोर्ट एवढं बिझी आहे की, त्यांना वेळच देत नाही. कोणाला बोलायचं हाच प्रश्न आहे.पक्षच बळावून घेतले जात आहेत. आता जानेवारीमध्ये निकाल देणार आहेत, तोपर्यंत निवडणुका होऊन जातात. तुम्हाला निवडून येणार अशी खात्री आहे, तर मग तुम्ही मैदानात या आणि निवडणूक लढा, असे आव्हानही शर्मिला ठाकरे यांनी शिवसेना व राष्ट्रवादीला दिले.

# प्रभागांमध्ये 'भावींचे' अनधिकृत फलक हटवा

**आयुक्त श्रावण हर्डीकरांनी दिले आदेश**

**पिंपरी :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनेक प्रभागांमध्ये 'भावी' पदाधिकाऱ्यांचे विनापरवाना फलक झपाट्याने उभे राहत असून त्यातून वाहतुकीस अडथळा आणि शहराच्या सौंदर्यावर डाग पडत आहेत. या अनधिकृत फलकांवर धडक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी आकाश चिन्ह व परवाना विभागाला दिले.

निवडणूक तयारीसाठी घेतलेल्या आढावा बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सहआयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त सचिन पवार उपस्थित होते. हर्डीकर म्हणाले, "प्रभागांतील चौक, रस्ते, वर्दळीच्या भागात इच्छुकांनी विनापरवाना फलकांचा फैलाव केला आहे. शहर विद्रूप करणारे, वाहतुकीला अडथळा ठरणारे सर्व फलक तातडीने हटवा. परवानाधारक होर्डिंगची माहिती अद्ययावत ठेवा आणि महसूल वाढवा." बीआरटी बसथांब्यांवरील मुदत संपलेली होर्डिंगही हटवा पीएमपीएमएल बसथांब्यावरच्या जाहिरातींच्या परवान्यांची मुदत संपूनही ठेकेदार अनधिकृतपणे जाहिराती लावत असल्याची तक्रार पीएमपी प्रशासनाने महापालिकेला केली आहे

बीआरटी मार्गावरील ही होर्डिंग तत्काळ हटवावीत, असा आग्रह करण्यात आला असून महापालिका त्यानुसार कारवाई करणार आहे. निवडणूक तयारीला गती मतदान केंद्रांची स्थळनिश्चिती, मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मतदार यादी अद्ययावत करणे, अपंगांसाठी सुविधा, प्रारूप मतदार यादीतील बदल, नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती या सर्व बाबींवर आयुक्तांनी सविस्तर सूचना दिल्या. तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करून निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याचा आदेशही त्यांनी दिला. रस्ते खड्डेमुक्त करण्याचेही आदेश दैनंदिन सेवा, स्वच्छता व्यवस्था, विकासकामांचा आढावा घेताना आयुक्तांनी रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवण्याचे, पाणीपुरवठा व प्रकाशयोजनेच्या कामांना गती देण्याचे निर्देश दिले. आकाश चिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी सांगितले की, "शहरातील अनधिकृत फलकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू असून लवकरच बीआरटी मार्गावरील जाहिरात होर्डिंगही हटवली जाणार आहेत." शहरातील अनधिकृत फलकां विरोधात महापालिकेची ही मोहीम पुढील काही दिवस अधिक जोमात राबवली जाणार आहे.

# पीएमपी बसमध्ये प्रवासी महिलेच्या दागिन्यांची चोरी

**पुणे :** पीएमपी प्रवासी महिलेच्या गळ्यातील ६० हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरट्यांनी लांबविल्याची घटना कात्रज भागात घडली. याबाबत एका महिलेने आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला धनकवडी भागात राहायला आहेत. १६ ऑक्टोबर रोजी त्या कात्रज बस स्थानक ते धनकवडी दरम्यान पीएमपी बसमधून प्रवास करत होत्या. बसमध्ये गर्दी होती. प्रवासात चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविले. मंगळसूत्र चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. पुणे शहर परिसरात पीएमपी प्रवासी महिलांकडील लाखो रुपयांचे दागिने चोरट्यांनी लांबविले आहेत. पीएमपी प्रवासी महिलांकडील दागिने चोरीच्या घटना विचारात घेता अशा प्रकारचे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण कमी आहे.